प्रतिनिधी
राजेंद्रकुमार शेळके

## थोडक्यात महत्वाचे




# सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा पारितोषिक समारंभ

पुणे : पुणे जिल्हा शिक्षण मंडळच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाला क्विक हील फाउंडेशनचे राज्यस्तरीय मानाचे पुरस्कार सायबर साक्षरतेच्या क्षेत्रात क्रांती घडवणाऱ्या क्विक हील फाउंडेशनच्या वतीने आयोजित सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमात हडपसर येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालयाने दैदिप्यमान यश संपादन केले आहे. महाराष्ट्र सायबर पोलीस दलाचे डीआयजी संजय शिंत्रे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपन्न झाला. क्विक हीलचे संस्थापक डॉ. कैलास काटकर , डॉ. संजय काटकर आणि फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या मोहिमेत महाविद्यालयाला राज्यस्तरावर न्यू क्लब रनर-अप पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे सर यांना त्यांच्या उत्कृष्ट नेतृत्वाबद्दल सर्वोत्कृष्ट प्राचार्य रनर-अप हा विशेष बहुमान मिळाला. या यशस्वी मोहिमेच्या अंमलबजावणीत उपप्राचार्य डॉ. मुळे सर, उपप्राचार्या डॉ. शुभांगी औटी मॅडम, विभागप्रमुख डॉ. वाणी सर यांचे मोलाचे सहकार्य आणि प्राध्यापिका मनीषा गाडेकर यांचे विशेष परिश्रम लाभले. यावेळी महाविद्यालयाच्या सायबर क्लबमधील पदाधिकारी व सदस्यांच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले, ज्यामध्ये नॉमिनी प्रेसिडेंट तेजस दळवी, ॲक्टिव्हिटी डायरेक्टर अवधूत मोरे, मीडिया डायरेक्टर अश्लेषा डमगुडे, सेक्रेटरी यश भराटे आणि वॉरियर्स अहान दगडे व पायल पठारे यांचा गौरव करण्यात आला. समाजातील डिजिटल धोके ओळखून जनजागृती करणाऱ्या या सर्वांना बेस्ट वॉरियर्स अवॉर्ड प्रदान करण्यात आला. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सदस्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते सर्वांचे विशेष अभिनंदन करण्यात आले